# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:05.08.2025** **वार:मंगळवार**

---

1. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुका 2017च्या ओबीसी आरक्षणानुसार होणार- मुख्यमंत्र्यांची माहिती
2. राज्यातल्या पायाभूत सुविधांचे प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश माजी केंद्रीय मंत्री शिबू सोरेन यांचं निधन आणि
3. ओवल क्रिकेट कसोटीत भारताचा इंग्लंडवर रोमहर्षक विजय, मालिकेत बरोबरी

**<u>स्थानिक स्वराज्य संस्था</u>**

राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 2017 मधल्या स्थितीनुसार ओबीसी आरक्षणानुसार घेण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत ही माहिती दिली. राज्यातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका 2022 च्या प्रभाग रचनेनुसार घ्याव्या, अशी मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असल्याने 2017 मधल्या ओबीसी आरक्षणानुसार सर्व जिल्ह्यांमधे निवडणुका होतील, असं ते म्हणाले......

**या निकालाचे दोन अन्वयार्थ आहेत पहिला अन्वयार्थ की मागच्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयाने आपल्याला जी डायरेक्टिव्ह दिली होती की जुन्या ओबीसी आरक्षणाप्रमाणेच या ठिकाणी निवडणुका घ्या तीच डायरेक्शन आता कन्फर्म झालेली आहे त्यामुळे आता सगळ्या जिल्ह्यांमध्ये ओबीसी आरक्षण हे पूर्णपणे त्या ठिकाणी या निवडणुकीत राहणार आहे दुसरी मागणी त्यांनी केली होती की दोन हजार बावीस मध्ये जी काही रचना झाली होती त्याप्रमाणे म्हणजे तीन चा प्रभाग वगैरे अशा प्रकारची जी रचना झाली होती त्याप्रमाणे निवडणुका करा आपल्याला माहिती आहे की तो कायदाच आपण रद्द केला होता त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे की आता दोन हजार बावीस प्रमाणे नाही तर दोन हजार सतरा प्रमाणेच या ठिकाणी या निवडणुका होतील त्यामुळे या दोन्ही बाबी राज्य शासनाच्या सर्वोच्च न्यायालयाने मान्य केल्या आम्हाला अतिशय आनंद आहे की आता ओबीसी आरक्षणासहितच या निवडणुका होण्यावर पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयानं शिक्कामोर्तब केलं आहे**

**<u>संसद कामकाज</u>**

संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज काल दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर दोन्ही सदनात दिवंगत नेते शिबू सोरेन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज आज सकाळपर्यंत स्थगित करण्यात आलं. लोकसभेत, विविध मुद्द्यांवर विरोधी पक्ष सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे कामकाज आधी दुपारी 2 वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं. गेल्या 16 महिन्यांच्या कालावधीत रोजगार मेळ्यात 11 लाख जणांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी काल लोकसभेत, एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजने अंतर्गत येत्या 5 वर्षात 4 कोटीहून अधिक रोजगार संधी निर्माण करण्यासाठी सरकारनं 2 लाख कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<u>वॉररुम निर्णय</u>**

पायाभूत सुविधांचे प्रकल्प हाती घेतल्यानंतर ते तीन वर्षांत पूर्ण व्हायला हवेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. फडणवीस यांनी काल मुख्यमंत्री वॉररुमधील विविध 30 पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. वॉररुमधील निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. मेट्रो प्रकल्पाच्या शेवटच्या

स्थानकाजवळ गृहनिर्माण प्रकल्प उभारावेत. मेट्रो प्रकल्प तसंच इतर सुविधा प्रकल्पांसाठी लागणारा निधी तातडीनं वितरित करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. यावेळी वरळीतल्या बीडीडी चाळीतील रहिवाशांना तसंच नायगाव आणि एन. एम. जोशी मार्ग चाळीतील रहिवाशांना ठरलेल्या वेळेत सदनिका देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

**एकनाथ शिंदे-हिंगोली**

हिंगोली जिल्ह्याच्या विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल दिली. हिंगोली इथं कावड यात्रेच्या समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. सर्वसामान्य लोकांसाठी काम करणारं शासन सत्तेत आलं आहे; त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह अन्य कुठलीहे योजना निधीअभावी बंद पडणार नाही असं शिंदे म्हणाले. हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरीमध्ये काल कावड यात्रेला प्रारंभ झाला. चिंचाळेश्वर महादेव मंदिर ते हिंगोली अशी 18 किलोमीटर अंतराची ही कावड यात्रा असते. हर हर महादेवच्या गजरात शिवभक्तांनी हिंगोलीकडे प्रयाण केलं.

**कर्नाटक**

कर्नाटक राज्यातील अलमट्टी धरण आणि हिप्परगी बंधाऱ्यामधील बांधकामबाबतची अनियमितता राष्ट्रीय बांध सुरक्षा प्राधिकरणाकडून तपासली जाणार असल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना दिली. शिष्टमंडळासह केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांना माहिती दिली. कर्नाटक सरकारनं अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याचा प्रस्ताव सादर केला आहे; मात्र या निर्णयामुळे भविष्यात सांगली कोल्हापूर भागात पुराचा धोका निर्माण होऊ शकतो, ही आपत्ती टाळण्यासाठी विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील शिष्टमंडळनं काल केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांची भेट घेतली. या बैठकीत पाटील यांनी अलमट्टी धरण बाधतांना केलेल्या अनियमिततेची तपासणीचे निर्देश दिले, असं विखे पाटील यांनी सांगितलं.

**सायबर संस्कार-रत्नागिरी**

मोबाइलद्वारे होणाऱ्या फसवणुकीच्या घटना टाळण्यासाठी रत्नागिरीत नगरपालिकेच्या सहकार्याने सायबर संस्कार या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पालिकेच्या सर्व शाळांमध्ये हा कार्यक्रम आयोजित करण्याची सूचना पालकमंत्री उदय सामंत यांनी यावेळी केली. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**मोबाइलद्वारे फसवणुकीचे अनेक गुन्हे घडतात. कधी ओटीपी मागून, तर कधी बिल न भरल्यामुळे वीज तोडण्याची भीती घालून फसवलं जातं. हे जाळं ओळखायचं कसं, त्यात अडकू नये म्हणून आणि अडकायला झालं तर काय करायचं याबद्दलचं मार्गदर्शन डॉक्टर अक्षय फाटक या तरुण इंजिनीअरने 'सायबर संस्कार' या अनोख्या कार्यक्रमातून रत्नागिरीकरांना केलं. सायबर फसवणुकीची उदाहरणं सांगतानाच, मोबाइलची आवश्यक सेटिंग्ज आणि डिजिटल व्यासपीठावर माहितीची गोपनीयता जपण्याबद्दलही त्यांनी सांगितलं. आपल्या मैत्रिणीला अशाच एका प्रकारातून जीव गमवावा लागल्यानंतर त्यांनी सायबर संस्कारांचा वसा घेतला आहे. मोबाइल किंवा समाजमाध्यमांवरची खाती हॅक झाल्यास किंवा सायबर फसवणूक घडल्यास त्यातून तातडीने मार्ग काढण्यासाठी डॉ. अक्षय मदत करतात आणि तीही मानधन न घेता. कोणी मानधन देऊ केल्यास ते थेट दिव्यांग मुलांच्या संस्थांना द्यायला सांगतात. यातून आतापर्यंत त्या संस्थांना दीड लाख रुपयांहून अधिक देणगी मिळाली आहे. मुलांना मोबाइल द्यायचा झाल्यास काय करावं, याबद्दल सांगतानाच चांगली व्यक्ती घडण्यासाठी 'सायबर संस्कार' हा 17वा संस्कारही गरजेचं असल्याचं ते म्हणाले. आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**श्रावणी सोमवार**

दुसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त काल त्र्यंबकेश्वर, भीमाशंकरसह अन्य शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. त्र्यंबकेश्वरला जाण्यासाठी भाविकांनी रविवारी रात्रीपासूनच गर्दी केली होती. मध्यरात्री भाविकांनी ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला सुरूवात केली. सकाळी फेरी पूर्ण झाल्यानंतर त्र्यंबकेश्वराच्या दर्शनासाठी मंदिर परिसर भाविकांनी फुलून गेला होता.

**कानबाई-नंदुरबार**

खान्देशची कुलस्वामीनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कानबाईचं काल मोठ्या उत्साहात विसर्जन झालं. श्रावण महिन्याच्या पहिल्या आणि दुसऱ्या शनिवारी कानबाईचा हा उत्सव खान्देशात मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. या उत्सवासाठी कुटुंबातील सर्व मंडळी आवर्जून एकत्र येतात. मागच्या आठवड्यानंतर काल दुसऱ्या टप्प्यात, कानबाईची वाजत गाजत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यात महिलांनी पारंपरिक पद्धतीनं फुगड्या घालत ताल धरला.

**अपघात-रत्नागिरी**

मुंबई-गोवा महामार्गावर रत्नागिरी तालुक्यातल्या हातखंबा गावात काल सकाळी घरगुती वापराचा गॅस वाहून नेणाऱ्या टँकरचा अपघात झाला. या अपघातात जीवितहानी झाली नाही. अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी काही काळ मुंबई-गोवा महामार्गावरची वाहतूक रोखून धरली होती.

**शिबू सोरेन-निधन**

माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचं काल नवी दिल्लीच्या सर गंगाराम रुग्णालयात निधन झालं, ते 81 वर्षांचे होते. गेल्या अनेक दिवसांपासून ते मूत्रपिंडविकारावर उपचार घेत होते. शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक सदस्य होते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या पहिल्या कार्यकाळात ते कोळसा मंत्री होते. आदिवासींच्या हक्कांसाठी त्यांनी दीर्घ लढा दिला होता. झारखंडचं मुख्यमंत्रीपद त्यांनी तीन वेळा भूषवलं. झारखंडचे विद्यमान मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे ते वडील होते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि इतर मान्यवरांनी काल शिबू सोरेन यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

**क्रिकेट**

अँडरसन- तेंडुलकर चषक क्रिकेट कसोटी मालिकेतल्या पाचव्या आणि अखेरच्या सामन्यात भारतानं इंग्लंडवर सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवत ही मालिका 2-2 अशी बरोबरीत सोडण्यात यश मिळवलं. विजयासाठी 374 धावांचं आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या इंग्लंडचा दुसरा डाव 367 धावात आटोपला. अखेरच्या दिवशी विजयासाठी इंग्लंडला केवळ 35 धावांची गरज असताना मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी भेदक गोलंदाजी करत यजमानांकडून विजय अक्षरशः खेचून आणला. नऊ  बळी घेणारा सिराज सामनावीर ठरला. अनेक नवखे खेळाडू असलेल्या भारतीय संघानं केवळ सहा धावांनी मिळावलेला हा रोमहर्षक विजय कसोटी क्रिकेटच्या इतिहासातला एक विक्रमच ठरला आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या मालिकेत उत्कृष्ट सांघिक कामगिरीचं दर्शन घडवलं. कर्णधारपदाच्या आपल्या पहिल्याच मालिकेत सर्वाधिक 754 धावा करणारा शुभमन गिल आणि इंग्लंडचा हॅरी ब्रूक यांना मालिकावीर घोषित करण्यात आलं.

**हवामान**

राज्यात येत्या 24 तासात कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार